आर.सी.एस.क्र. १०९/२०१७
विमलबाई वि. हरिदास
CNR No. MHAU110011532017

**आदेश नि.क्र. २६**

वादीने या अर्जाद्वारे दि.२०/४/२०२३ रोजी झालेला वादीचा साक्षीपुरावा डिस्कार्डचा आदेश रद्द होणे करीता दिला आहे. वादी क्र. ३ याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून सदर साक्षीदार वयोवृध्द असल्याने तो आजारी झाला होता. त्यामुळे ते उलट तपासणीसाठी हजर राहू शकला नाही. त्यामुळे दि.२०/४/२०२३ रोजी त्याचा पुरावा डिस्कार्ड केला आहे.

२. प्रतिवादीने तोंडी म्हणणे सादर केले. प्रतिवादींनचे कथन की, अर्ज न्यायतत्वास धरुन नाही. वादी जाणून बूजून गैरहजर राहून विलंब करीत आहे. तरी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दावा व रोजनाम्याचे अवलोकन केले. वादीने दावा वाटणी व स्वतंत्र ताब्या करीता केला आहे. प्रतिवादी याने वादीसोबतचे नातेसंबंध नाकारले आहेत. प्रकरण गुणवत्तेवर निकाली निघणेसाठी सदर साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे. तसेच सदर अर्ज मंजूर केल्यास दावा निकाली काढताना न्यायालयास मदत होणार आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता, सदरचा अर्ज मंजूर करता येईल, असे या न्यायालयाचे मत झाले आहे. तसेच वादीमुळे दावा प्रलंबित राहिलेला आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करतेवेळी वादीवर खर्च लादणे योग्य होईल. येणेप्रमाणे पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज खर्च रक्कम रु.१००/- सह मंजूर करण्यात येत आहे. वादीने खर्च रक्कम रु.१००/- प्रतिवादीस दयावा.

**(धनंजय एस.देवरे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**
**दि.२५.०१.२०२४.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer : S. D. Chavan
Court : Jt. C.J.J.D., Phulambri.
Date : 25/1/2024
Order signed by the
presiding officer on : 25/1/2024
Order uploaded on : 25/1/2024